सोमवार दि.२४ फेब्रुवारी २०२५

हे शब्द आज माझे झाले मुके तरीही !
ते बोलतील भाषा हमखास वादळाची !!
–अ‍ॅड.डॉ विजयकुमार कस्तुरे चिखलीकर

जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ

दैनिक बीड लोकनेता

मुख्यसंपादक : ज्ञानेश्वर बुधवत    संपादक : ज्ञानेश्वर मुंढे



सुवर्णसंधी...! दैनिक लोकनेता सुवर्णसंधी...!
पत्रकार होण्यासाठी सुवर्ण संधी
दैनिक लोकनेता (जनसामान्य माणसाचे हक्काचे व्यासपीठ)
अल्पावधीतच वाचकांच्या लेखकांच्या पसंतीत उतरलेल्या दैनिक लोकनेता साठी संपूर्ण महाराष्ट्रात जिल्हा, तालुका शहर व गाव पातळीवर प्रतिनिधी नेमणे आहे.अनुभवी व विनाअनुभवी इच्छुकांनी त्वरित संपर्क साधावा !
संपर्क :- संपादक ८४५९९७७९०४



RNI-MAHMAR/2023/89402 Email : elokneta@gmail.com वर्ष : ०२ अंक :१६२ किंमत २ रुपये Lokneta News - लोकनेता न्युज 8459977904 epaper.lokneta.in


## तिजोरीतील पैसे संपत आल्याने लाडक्या बहिणींना निकष

# रामदास आठवलेंचा सरकारला घरचा आहेर राज ठाकरेंनाही महायुतीत न येण्याचे आवाहन

लोकनेता न्यूज नेटवर्क

**पुणे (वृत्तसंस्था)**

मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना महायुतीसाठी विधानसभा निवडणुकीत गेमचेंजर ठरली. आता लाडकी बहीण योजना लाभार्थ्यांची संख्या कमी केली जात आहे. या योजनेसाठी कडक निकष लागू केले जात असून पात्र लाभार्थी महिलांची शासनाकडून पडताळणी होत आहे. यावरून रिपाइंचे अध्यक्ष रामदास आठवले यांनी महायुतील सरकारला घरचा आहेर दिला आहे. राज्य सरकारने लाडकी बहीण योजनेला सुरुवात केली त्यावेळी सरकारच्या तिजोरी मध्ये निधी होता. मात्र, आता तिजोरीतील पैसे संपत चालले आहेत. त्यामुळे या योजनेच्या लाभार्थ्यांना निकष लावण्यात येत असल्याचे रामदास आठवले म्हणाले.

गेल्या काही दिवसांपासून लाडकी बहीण योजनेला वेगवेगळे निकष लावण्यात येत आहेत. तर अनेक महिलांनी स्वेच्छेने पैसे परत करण्याचा निर्णय घेतला आहे. आतापर्यंत पाच लाख लाभार्भी महिलांची संख्या कमी झाली आहे. त्यामुळे रामदास आठवले यांनी एक प्रकारे आपल्या वक्तव्यातून सरकारला घरचा आहेर दिला. पिंपरी चिंचवडमध्ये रामदास आठवले यांच्या हस्ते झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्पाचे उद्घाटन झाले. यावेळी ते माध्यमांशी बोलत होते. आगामी महापालिका निवडणुकीत महायुती आणि मनसे युतीत असणार का, यावरून राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण आले आहे. यावरही रामदास आठवले यांनी प्रतिक्रिया दिली आहे.राज्य शासनाने लाडकी बहीण योजनेला सुरुवात केली, तेव्हा शासनाच्या तिजोरीत निधी होता. आता तिजोरीतील पैसे संपत चालले आहेत. त्यामुळे या योजनेच्या लाभार्थ्यांना निकष लावण्यात येत आहेत, असे म्हणत रामदास आठवले यांनी सरकारला घरचा आहेर दिला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधीही होतील. या पार्श्वभूमीवर महायुतीमधील तिन्ही पक्षांनी ही निवडणूक एकत्र लढवावी यासाठी आम्ही प्रयत्नशील असल्याचे रामदास आठवले म्हणाले. मनसेचे प्रमुख राज ठाकरे यांना मुख्यमंत्री एकदा भेटले ते ठीक आहे. मात्र, त्यांना वारंवार भेटणे हे काही बरोबर नाही. राज ठाकरे यांना महायुतीत घेणे बरोबर नाही. त्यांचा महायुतीला काही फायदा होत नाही. ते आले तर आम्हाला काय मिळणार? असा सवालही रामदास आठवले यांनी उपस्थित केला. त्यामुळे मित्रपक्षांनी आम्हाला विचारात घेतले पाहिजे. आम्हाला आत्ताच काही मिळत नाही. राज ठाकरे आल्यावर काहीच मिळणार नाही, असे मत त्यांनी व्यक्त केले. लोकसभेत त्यांचा काही फारसा फायदा आम्हाला झालेला नाही. राज ठाकरे हे आमचे चांगले मित्र आहेत. त्यांना महायुतीबरोबर घ्यायचे वगैरे चर्चा सुरू आहेत. पण त्यांना घेऊ नये. आम्ही असताना राज ठाकरेंची आवश्यकता नाही असे आमचे स्पष्ट मत असल्याचे रामदास आठवले म्हणाले.



---

लोहा प्रिमियम लीग क्रिकेट मध्ये सोशल मीडिया चांगल्या प्रकारे सांभाळल्याबद्दल

## आपला मराठवाडा डिजिटल न्युज लाइव्हचे संपादक गजानन दांगटे यांचा सन्मान चिन्ह देऊन विशेष गौरव

लोकनेता न्यूज नेटवर्क

**लोहा । विशाल घंटे**



दरवर्षी प्रमाणे याही वर्षी लोहा व शहरात ड्झङ लोहा प्रिमियम लीग क्रिकेट चे आयोजन करण्यात आले होते.यामध्ये दररोजच खेळाडूंना प्रोत्साहन देण्यासाठी संपादक गजानन दांगटे यांनी कर्तव्य बजावत खेळाडूना प्रोत्साहित केले.सोशल मीडिया चांगल्या प्रकारे सांभाळल्याबद्दल आपला मराठवाडा डिजिटल न्युज लाइव्ह चे संपादक गजानन दांगटे यांचा लोहा शहरातील समाजिक कार्यात सदा अग्रेसर असणारे लोह्याचे प्रथम नागरिक कै.माणिकराव पाटील पवार यांचे नातू सुधाकर पाटील पवार व –.ठ. हायस्कूल चे मुख्याध्यापक हमिद देशमुख सर यांच्या वतीने दोन वेगवेगळे सन्मान चिन्हे देऊन विशेष गौरव करण्यात आला.यावेळी विशेष उपस्थिती नांदेड पोलिस संजय जाधव,गट शिक्षणधिकारी सतिश व्यवहारे यांच्या उपस्थिती होती.

यावेळी डॉ. युवा नेते बापू नवनाथ चव्हाण ड्झङ लोहा प्रिमियम लीग कमिटीचे सोनू उर्फ व्यंकटेश संगेवार,युवा नेते अनिल धुतमल (सरकार),अविनाश पाटील पवार ,पप्पू ऊर्फ विजय पा. चव्हाण,गजानन चव्हाण,मा. नगरसेवक तथा युवा उद्योजक संभाजी पा. चव्हाण ,शिक्षक नेते हरीभाऊ चव्हाण ,मनसे चे गजानन पा.चव्हाण ,गजानन कळसकर,शहाजी पाटील पवार आदींची उपस्थिती होती.सर्व लोहा प्रिमियम लीग मधील भाग घेतलेले सर्व ओनर कर्णधार खेळाडू क्रिकेट प्रेमी यांच्या सह लोहा शहरातील प्रतिष्ठित नागरिकाकडून कौतुक होत आहे.

---

## श्री क्षेत्र काशी विश्वेश्वर सुरंगळी येथे अखंड हरिनाम सप्ताहस सुरुवात

ह.भ.प.दत्ता महाराज गोंदीकर यांच्या सुमधुर वाणीतून श्रीमद् भागवत कथा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**





भोकरदन तालुक्यातील श्री काशी विश्वेश्वर क्षेत्र सुरंगली येथे महाशिवरात्री महोत्सवास सालाबादप्रमाणे अखंड हरिनाम सप्ताहस प्रारंभ झाला असुन दिनांक २० फेब्रुवारी रोजी गुरुवारी रोजी प्रारंभ झाला आहे.सांगता महाशिवरात्री ला बुधवारी दिनांक २६ फेब्रुवारी रोजी होणार आहे.ह.भ.प. दत्ता महाराज गोदींकर यांच्या सुमधुर वाणीतुन श्रीमद् भागवत कथा वाचन होत आहे.दररोज अन्नदाता कडुन पंगतीचे आयोजन करण्यात आले आहे.महाशिवरात्र ला शाबुदांना खिचडी चे आयोजन करण्यात आले आहे. महाशिवरात्री ला रात्री श्री काशी विश्वेश्वर ला लघूरुद्र अभिषेक करण्यात येणार असुन गावातुन पालखी मिरवणूक काढण्यात येणार आहे.दिनांक ,२८ फेब्रुवारी शुक्रवारी रोजी महाप्रसादाचे भंडारा आयोजित करण्यात आला आहे.सर्व भाविक भक्तांनी लाभ घेण्याचे आवाहन समस्त गावकरी यांनी केले आहे.

---

## दुर्गम भागातील कन्येची यशस्वी गरुड झेप!

### वडिलांचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी फिलिपिन्स देशात वैद्यकीय शिक्षण पूर्ण

गावात एमबीबीएस डॉक्टर होण्याचा पहिला बहुमान ही मिळवला



लोकनेता न्यूज नेटवर्क

**औंढा नागनाथ । प्रतिनिधी**

औंढा नागनाथ: तालुक्यातील गोजेगाव सारख्या दुर्गम, डोंगराळ भागातील एका कन्येने आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या बळावर यशस्वी गरुडझेप घेतली आहे. २०१९ साली केवळ १० गुणांवरून चइइड ला प्रवेश न झाल्यामुळे वडिलांच्या प्रेरणेने आणि स्वतःच्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर गोजेगावसारख्या डोंगराळ, ग्रामीण भागातून परदेशी शिक्षण घेऊन आपली चइइड ची डिग्री पूर्ण करून ग्रामीण आणि शहरी भागातील पालक, तरुण विद्यार्थ्यांसमोर आदर्श निर्माण केला आहे. फिलिपिन्स देशात शिक्षण घेताना डॉ.वैष्णवीने कोरोना सारख्या खडतर काळात सतत दोन वर्षे आई–वडिलांची भेट झाली नाही तरीही आपले शिक्षण अखंड सुरू ठेवत यशाला गवसणी घातली. त्यानिमित्ताने गोजेगावची भूमीकन्या कु.डॉ.वैष्णवीचा समस्त गोजेगावकर मंडळींच्या वतीने सामूहिक सत्कार करण्यात आला. डॉ.वैष्णवीचा सत्कार आहे असे कळताच औंढा नागनाथ पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री गणपत राहिरे यांनी आपल्या पोलीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांसह गोजेगावात दाखल होत हनुमान मंदिरासमोर पुष्पहार, शाल, पेढा भरवून सत्कार केला या वेळी वैद्यकीय शिक्षण पूर्ण करणाऱ्या वैष्णवी जायभाये या विद्यार्थिनीबद्दल गौरवोद्गार काढताना पोलीस निरीक्षक गणपत राहिरे म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी मोबाईल, सोशल मीडियाचा नाद सोडून यशाला गवसणी घालण्याचे आवाहन केले. याप्रसंगी डॉ.वैष्णवीचे पालक प्रा.डॉ.विठ्ठल जायभाये व सौ.विमल जायभाये यांचा देखील सन्मान करण्यात आला. याप्रसंगी पंडितराव सांगळे, औंढा नागनाथ पंचायत समितीचे माजी सभापती श्री राजेंद्र सांगळे, सरपंच सौ. वर्षा अच्युत नागरे, उत्तमराव नागरे, शेषराव सांगळे, ज्ञानदेव जायभाये, नामदेव जायभाये, पांडुरंग सांगळे, आकाश जायभाये, बाळू सांगळे, तुकाराम कागणे, बाळासाहेब जायभाये, पंढरीनाथ जायभाये, यांच्यासह गावातील असंख्य मंडळी उपस्थित होती

---

## राष्ट्रसंत गाडगे महाराज जयंती गावकऱ्यांच्या माध्यमातून ग्रामस्वच्छता अभियान राबवून साजरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**भोकरदन । राम शिंदे**

राष्ट्रसंत आज राष्ट्रसंत गाडगे महाराजांच्या जयंती निमित्ताने भायडी गावांमध्ये सर्व गावकऱ्यांच्या माध्यमातून ग्राम स्वच्छता अभियान राबवून साजरी करण्यात आली . यावेळी ग्रामपंचायत सदस्या सुनिता प्रल्हादरावजी सोनवणे यांच्या हस्ते पूजन करण्यात आले . ग्रामस्वच्छता मध्ये भाऊसाहेब दसपुते ,सागर कडूबा निकाळजे प्रकाश साळवे, आनंदा बोर्डे रामराव माळोदे,रामेश्वर जंजाळ, तसेच ज्ञानेश्वर सोनवणे ,हरिदास सोनवणे ,परमेश्वर गोरे, सहित महिला उपस्थितीत स्वच्छता अभियान राबविण्यात आले व शपथ घेण्यात आली.. लोकजागर अभियान चे अध्यक्ष केशव पाटील जंजाळ



---

## थलेटिक्स स्पर्धेमध्ये परिक्रमा तंत्रनिकेतनच्या खेळाडूंचे यश

लोकनेता न्यूज नेटवर्क

**श्रीगोंदा । ज्ञानेश्वर येवले**





इंटर इंजीनिअरिंग डिप्लोमा स्टुडन्ट स्पोर्ट्स असोसिएशन विभागीय स्पर्धा मध्ये त्रिमूर्ती डी फार्मसी,नेवासा फाटा. येथे २२ फेब्रुवारी रोजी संपन्न झालेल्या थलेटिक्स या स्पर्धेमध्ये परिक्रमा पॉलिटेक्निक चे खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत घवघवीत असे यश संपादन केले. मुलींमध्ये कु.वैष्णवी शेंडगे हिने १०० मीटर आणि २०० मीटर मध्ये प्रथम क्रमांक मिळवला. व मुलांमध्ये कु.संकेत कोकाटे १०० मी. प्रथम तसेच कु.अविनाश गावडे उंच उडी व तिहेरी उडी मध्ये प्रथम क्रमांक पटकावून १मार्च रोजी जिंतूर,पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय थलेटिक्स स्पर्धेसाठी निवड झाली.

या खेळाडूंचे परिक्रमा शैक्षणिक संकुलाचे संस्थापक, माजी नामदार बबनराव पाचपुते, अध्यक्षा डॉ.सौ.प्रतिभाताई पाचपुते, सचिव आमदार श्री.विक्रमसिंह पाचपुते, मुख्य कार्यकारी अधिकारी ड. प्रतापसिंह पाचपुते, कॅडमी डायरेक्टर सौ.इंद्रायणी पाचपुते, मुख्य अति. कार्यकारी अधिकारी प्रा. अनिल पुंड, अती.कॅडमी डायरेक्टर संजिवजी कदमपाटील, तंत्रनिकेतन प्राचार्य डॉ. प्रशांत सूर्यवंशी, , इंजीनिअरिंग प्राचार्य मोहन धगाटे, एम.बी.ए. डायरेक्टर डॉ. सुदर्शन गिरमकर, बी.फार्मसी प्राचार्य डॉ. सुनील निर्मळ डी.फार्मसी प्राचार्य रमेश शिंदे, सायन्स कॉलेज प्राचार्य डॉक्टर पांडुरंग इथापे यांनी अभिनंदन केले. व राज्यस्तरीय स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या. या खेळाडूंना परिक्रमा तंत्रनिकेतनचे प्राचार्य डॉ.प्रशांत सूर्यवंशी सर व शारीरिक शिक्षण संचालक प्रा.अशोक राहिंज यांचे मार्गदर्शन लाभले.

## खेळ पैठणीचा या कार्यक्रमास महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

# या स्पर्धेत कड्याच्या शुभांगी देवकर यांनी उत्कृष्ट कामगिरी करत प्रथम क्रमांक पटकावला

### महिलांच्या या स्पर्धेत उत्साह आणि सहभाग लक्षणीय होता,ज्यामुळे कार्यक्रम विशेष आकर्षण ठरला





■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

जामगावचे सरपंच राधेश्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्त आष्टी येथे शुक्रवारी पंचायत समितीच्या प्रांगणात महिलांसाठी सीने अभिनेते क्रांतीनाना मळेगावकर यांचा खेळ पैठणीचा या होम मिनिस्टर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी झालेल्या विविध खेळांच्या स्पर्धेत प्रथम क्रमांक कडा येथील शुभांगी देवकरने पटकावला मानाची पैठणी,फ्रीज,सन्मानचिन्ह असे बक्षिसांचे स्वरूप होते.प्रामुख्याने मनोरंजन व प्रश्नमंजुषा व विविध उपक्रमास महिला वर्गांची अलोट गर्दी कार्यक्रमाचा केंद्रबिंदू ठरला.

श्याम धस यांच्या वाढदिवसाच्या अनुषंगाने महिला भगिनींसाठी खास सिने अभिनेते क्रांतीनाना मळेगावकर यांच्या राज्यभर गाजत असलेल्या होम मिनिस्टर 'खेळ पैठणीचा' या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या वेळी महिलांनी तळ्यात मळ्यात,उखाणे,फुगा फोडणे,फॅशन शो या सह अनेक गीतांवर ठेका धरत स्पर्धेत आपला सहभाग नोंदविला.अभूतपूर्व उत्साही वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.हा कार्यक्रम आयोजित केल्याबद्दल हजारोच्या संख्येने आलेल्या महिलांनी श्याम धस यांचे विशेष आभार मानले.शिवाय आकर्षक बक्षिसांची लयलूट यावेळी पहायला मिळाली.ज्यामध्ये प्रथम पारितोषिक म्हणून घरगुती वापराचे फ्रीज द्वितीय पारितोषिक एल. इ. डी. टीव्ही,तृतीय पारितोषिक कुलर,चतुर्थ पारितोषिक वॉटर फिल्टर,पाचवे पारितोषिक मिक्सर होते.ज्यामध्ये अनुक्रमे प्रथम येण्याचा मान कडा येथील शुभांगी गणेश देवकर यांनी द्वितीय शितल सतीश भोसले तृतीय काजल भाऊसाहेब भोजने चतुर्थ रोहिणी दिलीप जगताप तर पाचवे पारितोषिक जया परमेश्वर वारंगुळे यांनी पटकावले. शिवाय यामध्ये सहभागी झालेल्या तीनशे महिलांना आकर्षक स्वरूपात भेटवस्तू देण्यात आल्या तर अनुक्रमे विजेत्या महिलांसह इतर दहा महिलांना पैठणीचे वाटप करण्यात आले.श्याम धस यांच्या वाढदिवसानिमित्त शुक्रवारी सकाळी नऊ ते पाच या वेळेत पंचायत समिती कार्यालयाच्या प्रांगणात आयोजित रक्तदान शिबिरामध्ये १३० रक्तदात्यांनी रक्तदान केले.

## संत गाडगेबाबा यांच्या जयंती निमित्त रुग्णांना फळ वाटप



■ लोकनेता न्यूज नेटवर्क

बिलोली । गौतम गावंडे

बिलोली शहरातील ग्रामीण रुग्णालय बिलोली येथे राष्ट्रसंत व संत गाडगेबाबा महाराज यांच्या जयंतीनिमित्त बिलोली शहरात ग्रामीण रुग्णालय बिलोली येथील डॉक्टर , नर्सच्या हस्ते सामाजिक कार्यकर्त्यांच्या हस्ते रुग्णांना फळे वाटप करण्यात आले. शहरातील ग्रामीण रुग्णालय येथे रुग्णांना राष्ट्रसंत गाडगे महाराज यांच्या विषयी माहिती सांगण्यात आली. बिलोली शहरातील सामाजिक कार्यकर्ते दिलीप उत्तरवार, माधव मेघमाळे, गजानन इबितवार, बालाजी हरणे, सुनील हरणे, छत्राजी नागेश्वर, सुनील जिंकलवाड, सतीश मुंडकर, सुनील हरणे गजानन, बिलोलीकर, गणेश मैत्री, शहरातील सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहून रुग्णांना फळे वाटप करण्यात आले.

## चेन्नई येथील इंडियन डेंटल शाखेच्या परिषदेमध्ये अहिल्यानगर डेंटल शाखा ९ पुरस्काराने सन्मानित

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

अहिल्यानगर । प्रतिनिधी




चेन्नई येथे इंडियन डेंटल शाखेची ७५ व्या परिषदेमध्ये अहिल्यानगर डेंटल शाखेचा ९ पुरस्कार देवुन सन्मान करण्यात आला. यावेळी शाखेच्या सचिव डॉ.नेहा जाजू यांनी हा पुरस्कार स्विकारला. यावेळी जनरल सेक्रेटरी डॉ. अशोक ढोबळे, डॉ. रविंद्र नाथ, डॉ.शुभ्रा नंदी, डॉ.राजीवकुमार चुग आदी मान्यवरांच्या हस्ते देण्यात आला. इंडियन डेंटल अहिल्यानगर शाखेने राज्यात चांगली कामगिरी केल्याने त्यांना ९ पुरस्कार देवुन डेंटल परिषदेमध्ये गौरविण्यात आले. याप्रसंगी अहिल्यानगर शाखेच्या सचिव नेहा जाजू म्हणाल्या की, हा जो पुरस्कार शाखेला मिळाला, तो आमच्या संपूर्ण शाखेचे टिमवर्क होय. तसेच तत्कालीन अध्यक्ष डॉ.मनिषा कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली डेंटल शाखेने उत्कृष्ट असे काम केले आहे. असे त्या म्हणाल्या. यावेळी बोलताना डॉ.जाजू म्हणाल्या की आहिल्यानगरच्या इंडियन डेंटल शाखा खरोखरच पुरस्कारास प्राप्त ठरल्या आहेत. शाखेच्या सर्व पदाधिकारी या महिला असल्याने त्यांनी आपल्या कार्याने संपूर्ण राज्यात खरोखरच कौतुकास पात्र आहे. येथील चेन्नई येथील सेमिनारच्या माध्यमातून निश्चितच सर्व दंत वैद्यकीय यांना खूप काही शिकण्यासाठी मिळाले, असे त्या म्हणाल्या. यावेळी बेस्ट लोकल ब्रांच प्रेसिडेंट डॉ. मनीषा कुलकर्णी, बेस्ट सेक्रेटरी डॉ. नेहा जाजू, रनर ऑफ ट्रॉफी बेस्ट लोकल ब्रांच जनरल डॉ.अमृता देडगांवकर, ऑल राऊंड ऍक्टिव्हिटी लोकल ब्रांच, सायंटिफिक ऍक्टिव्हिटी अवॉर्ड, बेस्ट सी.डी.एच.ऍक्टिव्हिटी, रुलर ऍक्टिव्हिटी अवॉर्ड, स्कूल डेंटल हेल्थ, अवॉर्ड स्टूडंट ऍक्टिव्हिटी आदीबाबत गौरव करण्यात आला.

# होळच्या मातीचा मल्ल महाराष्ट्र केसरी होईल, तीच खरी मधुकर खाडे यांना श्रद्धांजली ठरेल

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

केज । प्रतिनिधी

मधुकर महाराज खाडे यांनी वारकरी संप्रदायात कार्याचा कळस केला आहे. कुस्ती क्षेत्रातही मोठे कार्य उभा केले. त्यांच्या शिष्यांनी महाराष्ट्र केसरी प्राप्त करून त्यांना श्रद्धांजली अर्पण करावी, अशी अपेक्षा संत भगवान बाबा वारकरी शिक्षण संस्थेचे संस्थापक, व्याकरणाचार्य ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांनी व्यक्त केली.वै.पै.मधुकर महाराज खाडे यांचे दि.६ फेब्रुवारी रोजी अपघाती निधन झाले. केज तालुक्यातील होळ येथे गंगापुजनानिमित्त भगवान बाबा मंदिरात दि.१३ ते १९ फेब्रुवारी दरम्यान किर्तन सप्ताह संपन्न झाला. ह.भ.प.अर्जुन महाराज लाड हे बुधवारी (दि.१९) काल्याच्या किर्तन सेवेप्रसंगी बोलत होते. त्यांनी संत तुकाराम महाराज यांचा 'अवघेची गोड जाले। मागीलये भरी आले।।१।। साहय जाला पांडुरंग। दिला अभ्यंतरीं संग ।।ध्रु.।। थडिये पावता तो वाव । मागे वाहावता ठाव ।।२।। तुका म्हणे गेले। स्वप्नींचे जागे जाले।।३।।' हा अभंग किर्तन सेवेसाठी घेतला होता. अर्जुन महाराज लाड म्हणाले, मधुकर महाराज खाडे यांच्या आग्रहास्तव मी होळला आलो आणि तब्बल २५ वर्ष झाले वास्तव्यास आहे. आळंदीसारखे तीर्थक्षेत्र सोडून इथे राहिलो, त्याचे पूर्ण श्रेय मधुकर खाडे यांना जाते. त्यांच्या सोबतीला भास्करराव शिंदे असत. या जोडगोळीने संस्थेला आधार दिला. भगवान बाबा वारकरी वारकरी शिक्षण संस्था, वेदांत साधनास्थली आश्रम, छत्रपती शिवाजी महाराज क्रीडा व व्यायामशाळा ही मधुकर खाडे यांच्या कार्याची स्मारके आहेत. आश्रमाचा देशात नावलौकिक आहे. संप्रदायातील पाखवाज वादक मनोज सोळंके हे भारतात प्रथम आले. संतोष महाराज यांनी संगीतात गोल्ड मेडल मिळविले, याचे श्रेय मधुकर खाडे यांना जाते. त्यांनी व्यायामशाळेतून अनेक पैलवान घडविले, आता महाराष्ट्र केसरी, हिंद केसरी होतील असे मल्ल तयार केले. त्यांचा एक तरी शिष्य महाराष्ट्र केसरी व्हावा, तीच खरी श्रद्धांजली ठरेल, असे मत ह.भ.प.अर्जुन महाराज लाड यांनी व्यक्त केले.

# पिंपळा गावातील सुपुत्र सचिन 'कल्पना' जनार्धन चव्हाण यांनी आपल्या आई वडीलांचे स्वप्न साकार करण्यासाठी खुप मेहनत घेतली

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

आष्टी । अण्णासाहेब साबळे

पिंपळा गावातील सुपुत्र सचिन 'कल्पना' जनार्धन चव्हाण यांनी आपल्या आई-वडिलांचे स्वप्न साकार करण्यासाठी खूप मेहनत घेतली आहे. त्यांनी आपल्या आयुष्यातील अनेक अडचणींवर मात करत आई-वडिलांना अभिमान वाटावा अशी कामगिरी केली.त्यांच्या जिद्दीने आणि अथक प्रयत्नांनी ते आज एका प्रतिष्ठित स्थानावर पोहोचले आहेत, ज्यामुळे गावातील आणि कुटुंबातील प्रत्येकाला त्यांचा अभिमान आहे.पिंपळा गावातील सुपुत्र सचिन 'कल्पना' जनार्धन चव्हाण यांना महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (चझडउ) राज्य कर सहाय्यक अधिकारी आणि महसूल सहाय्यक या दोन्ही पदांवर नियुक्ती झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन! त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे गाव,कुटुंब, आणि समाजाचा अभिमान वाढला आहे त्यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा!

शिक्षक:पहिली ते चौथी पर्यंत शिक्षण जि.प.प्रा शाळा मेहेत्रेवस्ती पिंपळा येथून तर पाचवी ते दहावी पर्यंत शिक्षण पिंपळेश्वर विद्यालय पिंपळा आणि अकरावी ते बीएससी पर्यंत शिक्षक जनता जुनिअर कॉलेज धानोरा झाले.

त्यानंतर माझा प्रवास हा स्पर्धा परीक्षेकडे वळवला पण काही कारणास्तव मला घरी सर्व कामे पाहून करावा लागत होता जसे की शेळ्या आणि जनावरे सांभाळणे पाच वर्ष दूध व्यवसाय केला या सर्व परिस्थितीत मी अभ्यास करत होतो त्यानंतर मी २०१९ मध्ये दीपस्तंभ फाउंडेशन जळगाव या




स्पर्धा परीक्षा संस्थांमध्ये परीक्षा देऊन प्रवेश मिळवला आणि माझे स्पर्धा परीक्षा करण्याचा मार्गाकडे खरे वळण मिळाले आणि माझे अभ्यास करण्याची चिकाटी वाढली त्यानंतर मी २०२१ मध्ये राज्यसेवा,PSI,STI,ASO,इंडस्ट्रियल इन्स्पेक्टर,एक्साईज इन्स्पेक्टर या परीक्षेचे मुख्य परीक्षा दिल्या व थोड्या थोड्या मार्कने माझ्या पोस्ट गेल्या. परत मी खचून न जाता जास्त जोमाने अभ्यास करून २०२३ मध्ये राज्यसेवा मुख्य,संयुक्त परीक्षा मुख्य उत्तीर्ण झालो आणि त्यामधून माझी निवड राज्य कर सहाय्यक अधिकारी आणि महसूल सहाय्यक या दोन्ही पदावर निवड झाली .परंतु या मुख्य परीक्षेच्या १५ दिवस अगोदर माझ्या आईचे दुःखात निधन झाले तरी मी न खचून जाता आईच्या दुःखातून स्वतःला सावरून मी माझ्या आईचे अधिकारी होण्याचे स्वप्न पूर्ण केले परंतु हे सर्व पाहण्यासाठी माझी आई या जगात राहिली नाही याचे मला खूप दुःख आहे .या सर्व काळात माझे कुटुंबीय आणि माझे मित्र परिवार शिक्षक यांची साथ राहिली

# उद्धव मामडे यांना संविधान गौरव दिनानिमित्त राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता पुरस्कार प्रदान

लोकनेता न्यूज नेटवर्क

**उमरी | महेश पडोळे**

उमरी तालुक्यातील मौजे धानोरा बु.येथील रहिवासी निर्भिड पत्रकार उद्धव मोहनराव मामडे यांना संविधान गौरव दिन सोहळा माता रमाई, छत्रपती शिवाजी महाराज गुरु रविदास महाराज संत सेवालाल महाराज यांच्या संयुक्त जयंती महोत्सव उमरी निमित्त यांच्या संयुक्ताने राज्यस्तरीय उत्कृष्ट पत्रकारिता २०२५ चा पुरस्कार उद्योजक मारोतराव कवळे गुरुजी, पारसमल दर्डा, ईश्वर आण्णा सवई,रतन खंदारे,तुपसाखरे दत्तात्रय आयोजक सोनु भाऊ वाघमारे सह अनेक दिग्गज मान्यवरांच्या हस्ते हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे.

आयोजक सोनु भाऊ वाघमारे व कमिटी उमरी येथे पुरस्कार जाहीर निवड प्रमाण पत्र देऊन आमंत्रित करण्यात आला आले. पत्रकारीता क्षेत्रामधील उल्लेखनीय कार्याबद्दल हा पुरस्कार त्यांना जाहीर झाला असून त्यांना यापूर्वीही पत्रकार व सामाजिक क्षेत्रातील ४७ पुरस्कार मिळालेले आहेत. महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या आदर्श व्यक्तीला विविध पुरस्काराने, विविध व्यक्तींना राज्यस्तरीय हा पुरस्कार दरवर्षी दिला जातो. यामध्ये राज्यस्तरीय पत्रकारिता, शैक्षणिक,सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक,क्रीडा, संघटन, आरोग्य,कृषी,वन विभाग आदी क्षेत्रातील



उल्लेखनीय कार्याबद्दल पुरस्काराने गौरविले जाते. दि.२२ फेब्रुवारी रोजी सायंकाळी उमरी बुद्ध विहार येथील दिमाखदार सोहळ्यात हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडला आहे.पत्रकार उद्धव मोहनराव मामडे रावधानोरकर यांना हा मान नेतृत्वाचा सन्मान कर्तृत्वाचा हा आदर्श पत्रकार राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर दिल्याबद्दल राजकीय पक्ष पत्रकार बांधव कुटुंबा सह मित्र परिवार सर्व स्थरातून त्यांचे अभिनंदन व शुभेच्छाचा वर्षाव होत आहे. या संविधान गौरव दिन सोहळा माता रमाई, छत्रपती शिवाजी महाराज गुरु रविदास महाराज संत सेवालाल महाराज यांच्या संयुक्त जयंती महोत्सव उमरी निमित्त यांच्या संयुक्त जयंती निमित्त पुरस्कार सोहळा व भिम गिताचा कार्यक्रम हजारो भिम सैनिकांच्या उपस्थित संपन्न झाला.यावेळी आलेल्या मान्यवरांचे आयोजक सोनु भाऊ वाघमारे यांनी शाल श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला आहे.

## बळीराम पाटील कारतळकर यांचा स्वाभिमानी संभाजी ब्रिगेड मराठवाडा उपाध्यक्ष पदाचा राजीनामा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | प्रतिनिधी**

दि.२३/०२/२०२४ रोजी बळीराम पा कदम मराठवाडा उपाध्यक्ष स्वाभिमानी संभाजी ब्रिगेड संघटनेच्या पदाचा राजीनामा दिला असून त्यांनी मा.गजानन माने प्रदेशाध्यक्ष यांना आपला राजीनामा सुपूर्द केला आहे.पुढील दिशा थोड्याच दिवसात ठरवणार असल्याचे बळीराम पाटील कदम कारतळकर यांनी आमच्या प्रतिनिधींशी बोलताना सांगितले आहे. वैयक्तिकअडचणी मुळे मी आपल्या संघटनेच्या पदाचा स्वतः हुन राजीनामा देत असल्याचे त्यांनी प्रदेशाध्यक्षांना कळविले आहे.



## भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळयाच्या कंपाऊंडची उंची वाढवून सुशोभीकरण करण्याची आ.प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या कडे डॉ बाळासाहेब पवार यांची मागणी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव पाटील गायकवाड**

कंधार शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी विश्वरत्न भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा असून सध्या महाराणा प्रताप चौक ते छत्रपती शिवाजी महाराज चौक रस्त्याचे रुंदीकरण करण्यात आले असून पुर्वी असलेले भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याचे कंपाऊंड हे रोड लगत आले असून कंपाऊंडची उंची कमी झाल्यामुळे इतर प्राणी हे कंपाऊंड च्या आत येत आहेत. त्यामुळे पुतळ्याची विटंबणा होत आहे.त्यामुळे

लोकप्रिय आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर साहेबांनी सदरील प्रकरणाची पाहणी करुन भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याच्या कंपाऊंडची उंची वाढवून पुतळा परिसराचे सुशोभीकरण करावे.अशी मागणी डॉ.बाळासाहेब रामराव पवार राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष उपमुख्यमंत्री अजित दादा पवार गटाचे माजी नगरसेवक प्रतिनिधी कंधार जि.नांदेड यांनी निवेदनाद्वारे केली आहे.



## युरोपमध्ये होणाऱ्या कुडो वर्ल्ड कप स्पर्धेकरिता सुर्डीच्या सौरभ जाधवची निवड

### आ.विजयसिंह पंडित यांनी सत्कार करुन दिल्या शुभेच्छा

लोकनेता न्यूज नेटवर्क

**गेवराई | ज्ञानेश्वर उदावंत**

युरोपमध्ये होणाऱ्या कुडो वर्ल्डकप स्पर्धेसाठी गेवराई विधानसभा मतदारसंघातील सुर्डीच्या सौरभ जाधव यांची निवड झाली असून आ. विजयसिंह पंडित यांनी सौरभचा जाहीर सत्कार करून स्पर्धेसाठी जाणाऱ्या सौरभ जाधवचा गेवराई विधानसभा मतदार संघाला अभिमान आहे अशी प्रतिक्रिया विजयसिंह पंडित यांनी यावेळी दिली.

युरोपमध्ये होणाऱ्या कुडो वर्ल्ड कप स्पर्धेसाठी शनिवार दि. ७ फेब्रुवारी रोजी थलेटीका फिटनेस, सूरत येथे



वर्ल्ड कप निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले होते, त्यात भारतातील एकूण २६ राज्यातील कुडो राष्ट्रीय विजेत्या स्पर्धकांनी सहभाग घेतला होता. त्यात बीड जिल्ह्यामधून महाराष्ट्र राज्यामार्फत गेवराई विधानसभा मतदारसंघातील मोजै सुर्डी येथील सौरभ जाधवची निवड करण्यात आली. युरोप येथे जून २०२५ मधे होणाऱ्या कुडो वर्ल्ड कप स्पर्धेसाठी सौरभची निवड झाली असून राष्ट्रीय कोचहांशी मेहुल वोरा यांच्या मार्गदर्शनाखा भारत देशाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी युरोप येथे टीम इंडिया जाणार आहे. सोरभला प्रशिक्षक अरविंद मोरे, ज्ञानेश्वर गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले.सौरभ जाधवची निवड झाल्याबद्दल आ. विजयसिंह पंडित यांनी त्यांचा सत्कार करुन पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. गेवराई विधानसभा मतदारसंघाच्या क्रीडा क्षेत्रात चांगले वातावरण तयार होत सौरभ जाधवची निवड मतदारसंघासाठी अभिमानास्पद आहे असेही विजयसिंह पंडित यावेळी बोलताना म्हणाले. याप्रसंगी सुर्डीचे सरपंच महादेव सोळुंके, राम कुलकर्णी, अर्जुन कुलकर्णी, यश अतकरे, गणेश सुर्डीकर आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## श्री बालाजी फिल्डवेल सोसायटीच्या माध्यमातून कन्यादान योजनेसाठी स्वप्नजा दामले ठरली प्रथम मानकरी

लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड | बाजीराव पाटील गायकवाड**

पेठवडज नगरीमध्ये प्रथमच मोलाचे कार्य श्री बालाजी फील्डवेल सोसायटीच्या माध्यमातून गावातील मुलीच्या कन्यादानासाठी पाच हजार शंभर रुपये देण्याचे महान कार्य श्री बालाजी फिल्डवेल सोसायटीच्या अध्यक्षा सौ.सुनिताताई अशोकराव डावकोरे मॅडम व बालाजी फिल्डवेल सोसायटी लि पेठवडज चे तांत्रिक सल्लागार श्री अशोकराव श्यामराव डावकोरे साहेब यांच्या वतीने सर्व समाजातील मुलींच्या लग्नामध्ये कन्यादानसाठी ५१०० (पाच हजार शंभर) रुपयांचे कन्यादान देण्यात येत असुन पेठवडज नगरीतील पांच हजार शंभर रुपयाचे प्रथम मानकरी श्री आनंदा पांडुरंग पाटील दामले यांची कन्या स्वप्नजा दामले ही पहिली कन्या कन्यादानासाठी मानकरी ठरली आहे



तीचे कन्यादान सौ सुनिताताई डावकोरे व श्री बालाजी फिल्डवेल सोसायटी लि पेठवडज चे तांत्रिक सल्लागार श्री अशोकराव डावकोरे साहेब यांच्या हस्ते कन्यादान करण्यात आले.

## आष्टी येथील बेलेश्वर मंदिरात महाशिवरात्री निमित्त पंचदिनी हरिनाम सप्ताहाचा प्रारंभ



लोकनेता न्यूज नेटवर्क

**आष्टी | अण्णासाहेब साबळे**

सालाबादप्रमाणे साधु संतांच्या आशीर्वादाने आष्टी येथील सावता नगरातील बेलेश्वर मंदीरात दि.२३ ते दि.२७ फेब्रुवारी २०२५ या कालावधीत अखंड हरिनाम सप्ताह व शिवलिला अमृत सोहळा आयोजित केला आहे.या सप्ताहाचा प्रारंभ दिप प्रज्वलन व विणा पुजन आष्टी तालुका वारकरी मंडळाचे तालुकाध्यक्ष ह.भ.प.दिनकर महाराज तांदळे,ह.भ.प.अशोक डोके सर यांच्या हस्ते करण्यात आले.याप्रसंगी उपस्थित ह.भ.प.डोरले नाना,श्री ग्यानदेव धोंडे,संपतराव धोंडे,विणापुजन बलभीम रंगनाथ धोंडे,हौसराव आजबे महाराज,ध्वजपुजन उद्योगपती आण्णासाहेब चौधरी,जेष्ठ पत्रकार उत्तम बोडखे,पत्रकार अण्णासाहेब साबळे,एन.टी.गर्जे,प्रा.मोहन धोंडे, प्रा.डॉ.बापुराव उर्फ सुर्यकांत धोंडे,ग्रंथपुजन डॉ.अजयदादा धोंडे,माजी नगराध्यक्ष रंगनाथ धोंडे,चेअरमन बाळासाहेब शिंदे, माजी नगरसेवक स्वप्निल धोंडे, नगरसेवक अक्षय धोंडे,नगरसेवक नाना राऊत,बाळू सत्रे,महिला भक्तीजन मंडळ उपस्थित होते.या सप्ताहात काकडा भजन,विष्णु सहस्त्रनाम,शिवलिला अमृत ग्रंथपारायण,हरिपाठ,हरिकिर्तन होणार आहे.आज रविवार दि २३ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.निवृत्ती महाराज बोडखे (आनंदवाडी) यांचे हरिकीर्तन झाले.आज सोमवारी दि.२४ फेब्रुवारी रोजी ह.भ.प. ज्ञानेश्वरीताई महाराज पौळ बालकीर्तनकार (अ.नगर) मंगळवारी दि.२५ फेब्रुवारी रोजी ह.भ.प.श्रीहरि महाराज पुरी (आष्टी),बुधवारी २६ फेब्रुवारी ह.भ.प.विष्णू महाराज लिंबोडीकर (रामगड संस्थान देविनिमगांव),गुरूवार दि.२७ फेब्रुवारी २०२५ रोजी सकाळी १० ते १२ वा.या वेळात ह.भ.प.रामायणाचार्य गणेश महाराज कुदळे(चिंचोडी शिराळ) यांचे काल्याचे हरिकीर्तन होणार आहे.मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन बेलेश्वर महादेव मंदिर देवस्थान समितीच्या वतीने करण्यात आले.

## जिल्हा परिषद माध्यमिक शाळा महागाव माजी विद्यार्थ्यांचे गेट-टु गेदर मोठ्या थाटात संपन्न

लोकनेता न्यूज नेटवर्क

**महागाव | विजय थोरात**

जिल्हा परिषद हायस्कूल माध्यमिक विद्यालयांच्या २००५ च्या बॅचमधील दहावीपर्यंत शिक्षण घेतलेल्या माजी विद्यार्थ्यांचे गेट टू गेदर मेळावा दिनांक २३ फेब्रुवारी २०२५. वीस वर्षे पूर्ण झाले निमित्ताने सर्व मित्रमंडळी व शिक्षण वृंद आज रोजी जिल्हा परिषदेच्या प्रांगणात एकत्र जमले.

कार्यक्रमाला सुरुवात होण्याच्या आधी. दीप प्रज्वलित करून. राष्ट्रसंत संत गाडगेबाबा. जयंती निमित्ताने सर्व शिक्षण वृंदांनी पुष्प हार टाकून वंदन केले. प्राध्यापक जोगमोडे सर वेरूळकर सर, भंडारे सर, जाधव सर, देशमुख सर, लाखने सर, केशववार सर, केशव वार मॅडम, कोल्हेकर मामा, तसेच विद्यार्थ्यांच्या विनंतीला मान देऊन उपस्थित, महागाव नगरपंचायत चे उपनगराध्यक्ष, तथा शिवसेना उपजिल्हाप्रमुख शाखा भाऊ भरवाडे उपस्थित होते. पुढील कार्यक्रमाला सुरुवात राष्ट्रगीत गाऊन सुरुवात झाली. त्यानंतर शिक्षक वृंदांचे स्वागत शाल पुष्पगुच्छ देऊन करण्यात आले.



त्यानंतर एक एक विद्यार्थ्यांनी आपल्या जुन्या आठवणी व्यासपीठावर व्यक्त केल्या. स्वप्निल कावळे, गजानन मोरे, रामेश्वर राऊत, विजय थोरात, अमोल राजनकर, संतोष नरवाडे, पवन भांगे, संदेश पोदुतवार, राहुल पांडे, प्रफुल नरवाडे, पवनदीप, गजानन होळकर आशिष करे, एजाज शेख, उमेश चौधरी, समाधान वाघ, निलेश चिंचोळकर, कृष्णा राऊत, रामभाऊ मुखडे, कुंडलिक घोडे विशाल सावळे, सुधाकर दिल शिंगारे, सचिन कोल्हे निलेश कदम मंगेश कोल्हेकर, सतीश भुसाळे , रवींद्र राठोड रत्नाकर सांगडे, अभिजीत कावळे विशाल, अनिल गावंडे, प्रभाकर इंगोले, पवन भांगे, अजीम सुरैया, फय्याज भाई. माधव ठाकरे. मित्रमंडळींनी आपल्या शब्दातून जुन्या आठवणी प्रकट केल्या. तसेच शिक्षक वृंदांनी सुद्धा त्यांच्या विद्यार्थ्यांचे कौतुक करताना आनंद अश्रू प्रत्येक शिक्षकांच्या डोळ्यात दिसत होते. प्रत्येक शिक्षकांनी मोलाचे मार्गदर्शन त्यांच्या विद्यार्थ्यांना केले. रविभाऊ वाघमारे आणि शाखा भाऊ भरवाडे. यांनी सुद्धा आपल्या शालेय जीवनाबद्दल खूप मजेदार किस्से विचार मंचावर मांडले. मुख्याध्यापक सर चव्हाण सर. यांनी सुद्धा व्हिडिओ कॉल द्वारे सर्व विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या व स्वतः न उपस्थित राहिल्याकारणास खंत व्यक्त केली. तसेच. कराळे मॅडमनी. सर्व विद्यार्थ्यांना पुस्तक वाटप केले. वेरूळकर सरांनी. कॅलेंडर वाटप केले. त्यानंतर भोजनाचा कार्यक्रम प्रारंभ झाला. भोजन करताना सर्वांनाच ते लहानपणचे दिवस आठवणीत आले. शिक्षक लोकांनी तर निरोप घेताना विद्यार्थ्यांना मिठीत धरले. असे हे पवित्र नाते. फक्त शिक्षक, आणि विद्यार्थ्यांतच जमू शकते, हे पूर्ण सर्वांना दाखवून दिले.

# देगलूर तालुक्यातील ४९ गावातून ६७ जागांसाठी अंगणवाडी सेविका व मदतनीसच्या जागा भरणे सुरू

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**देगलूर । जयपाल दावनगीरकर**

देगलूर येथील एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्पा अंतर्गत तालुक्यातील ४९ गावातील अंगणवाडी सेविका १५ पदे रिक्त तर मदतनीसच्या ५२ रिक्त पदांसाठी असे एकूण ६७ रिक्त असलेल्या जागेवर इच्छुक उमेदवारांकडून अर्ज भरून घेण्याची प्रक्रिया प्रत्येक गावातून मागणी केलेली आहे या जागेवर मानधनी पदासाठी खालील नमूद रिक्त असलेल्या जागा भरायच्या असल्याने उपरोक्त संदर्भीय शासन निर्णय व परिपत्रकास अनुसरून खालील नमूद संबंधित महसूली गावातील इच्छुक व पात्र महिला उमेदवारांकडून दिनांक २० फेब्रुवारी ते दिनांक ०६ मार्च २०२५ या कालावधीत (सुट्टीचे दिवस उगळून) विहित नमुन्यातील परिपूर्ण अर्ज कार्यालयीन वेळेत मागविण्यात येत आहे.

अंगणवाडी सेविका व मदतनीस या ६७ जागेसाठी आवश्यक शैक्षणिक पात्रता बारावी उत्तीर्ण ८०% पेक्षा जास्त गुणवत्ता (राज्य शिक्षण मंडळ अथवा त्यास समकक्ष) अशी किमान शैक्षणिक पात्रता आवश्यक राहील इयत्ता १२ वी, पदवीधर पदव्युत्तर, डी.एड, बी.एड व शासकीय मान्यता संस्थेचे संगणक परीक्षा उत्तीर्ण प्रमाणपत्र (चड – उखढ) त्यांची साक्षांकित गुणपत्रके व प्रमाणपत्रके, तहसीलदार यांचे रहिवासी प्रमाणपत्र, वयाची अट दिनांक ०६ मार्च १९२५ रोजी १८ ते ३५ वर्षे, विधवा महिलांसाठी वयोमर्यादा ४० वर्षापेक्षा जास्त नसावे. अर्जासोबत वयाचा पुरावा म्हणून शाळा सोडल्याचा दाखला किंवा इयत्ता दहावी उत्तीर्ण झाल्याचे प्रमाणपत्र, हयात दोन पेक्षा जास्त नसावे दोन हयात अपत्य असूनही तिसरे अपत्य झाल्यास सेवेतून काढून टाकण्यात येईल, दत्तक घेतलेल्या मुलांचा किंवा मुलींचा समावेश होणार नाही. विधवा महिला किंवा अनाथ मुलींना १० अतिरिक्त गुण देण्यात येतील मागासवर्गीय उमेदवार असल्यास (अनुसूचित जाती, जमाती) यांना पाच गुण इतर मागासवर्गीय विभक्त जाती, भटक्या जमाती, आर्थिक दृष्ट्या दुर्बल घटक, विशेष मागास प्रवर्ग, सामाजिक व शैक्षणिक दृष्ट्या मागासवर्ग उमेदवारांना अतिरिक्त तिन गुण देण्यात येतील त्यासाठी उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, सक्षम प्राधिकारी यांचे कडून निर्गमित केलेले जातीचे प्रमाणपत्र, अंगणवाडी सेविका, मिनी अंगणवाडी सेविका व मदतनीस म्हणून कमीत कमी दोन वर्षाचा अनुभव बाल विकास प्रकल्प अधिकारी यांचे मूळ अनुभव प्रमाणपत्र असल्यास सात गुण देण्यात येतील व सदरील प्रमाणपत्र जोडणे बंधनकारक राहील अर्जासोबत नियुक्तीनंतरही बनावट कागदपत्र सादर केल्यास फौजदारी गुन्हा दाखल होऊ शकतो शासन निर्णयान्वये नव्याने नियुक्त करण्यात येणाऱ्या अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची सेवा वयाच्या ६० वर्षापर्यंत कालावधीचा राहील अर्ज प्राप्त झाल्यानंतर प्राप्त अर्जाची छाननी करून उमेदवारांची प्राथमिक यादी शिक्षण, वय, प्रवर्ग, अपत्य, विधवा /अनाथ यांना दिलेले गुण या बाबत तक्रार असल्यास दहा दिवसाच्या आत संबंधित कार्यालयात लेखी तक्रार सादर करावे अन्यथा तक्रार चालणार नाही. अंगणवाडी सेविका व मदतनीस ६७ जागेवर असलेल्या गाव ठिकाणी वेगवेगळे स्वतंत्र अर्ज सादर करावेत रिक्त असलेल्या महसुली गावातील अंगणवाडी केंद्राचे नाव जागा भरावयाच्या पदांचा तपशीलवार गाव व केंद्र निहाय अंगणवाडी सेविका व मदतनीस महिलांच्या जागा भरणे आहेत इच्छुकांनी आपल्या जवळील असलेल्या कागदपत्रासह देगलूर तहसील कार्यालयासमोर एात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयात विहित नमुन्यात अर्ज सादर करावेत. देगलूर तालुक्यातील ४९ गावातून अंगणवाडी सेविकेच्या १५ रिक्त पदासाठी तर मदतनीसच्या ५२ रिक्त पदांसाठी असे एकूण ६७ रिक्त पदांसाठी असलेल्या जागा भरायचे आहेत त्यापैकी तालुक्यातील अंगणवाडी सेविकांच्या व मदतनीसच्या जागा १) मौजे




भक्तापूर क्र.एक मध्ये अंगणवाडी सेविका एक पद, भक्तापूर क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद. २) मौजे कुन्मारपल्ली क्र. दोन मध्ये अंगणवाडी सेविका एक पद.३) मौजे लिंगनकेरूर अंगणवाडी सेविका एक पद ४) मौजे रामपूर पट्टी होट्टल अंगणवाडी सेविका एक पद.५) मौजे काठेवाडी अंगणवाडी सेविका एक पद , तर मदतनीस एक पद.६) मौजे ढोसणी अंगणवाडी सेविका एक पद.७) मौजे अंबुलगा अंगणवाडी सेविका एक पद.८) मौजे आलूर अंगणवाडी क्र. दोन मध्ये अंगणवाडी सेविका एक पद.९) मौजे शेखापुर अंगणवाडी सेविका एक पद.१०) मौजे मानूर तांडा/गुत्ती तांडा अंगणवाडी सेविका एक पद, बंजारा भाषिक अनिर्वाय.११) मौजे बीजलवाडी क्र.एक मध्ये अंगणवाडी सेविका एक पद, तर बिजलवाडी पश्चिम तांडा अंगणवाडी सेविका एक पद, बंजारा भाषिक अनिवार्य. १२) मौजे कुरुडगी ( बु.) अंगणवाडी सेविका एक पद तर मदतनीस एक पद.१३) मौजे वझरगा क्र. एक मध्ये अंगणवाडी सेविका एक पद तर वझरगा क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद. १४) मौजे कामाजीवाडी अंगणवाडी सेविका एक पद.१५) मौजे हाणेगाव क्र.एक मध्ये मदतनीस एक पद. हाणेगाव क्र. तीन मध्ये मदतनीस एक पद. हनेगाव क्र. चार मध्ये मदतनीस एक पद. हाणेगाव क्र. सहा मध्ये मदतनीस एक पद. हानेगाव क्र. सात मध्ये मदतनीस एक पद. हाणेगाव क्र. आठ मध्ये मदतनीस एक पद. हणेगाव इंदिरानगर मध्ये मदतनीस एक पद. हाणेगाव दामला तांडा मदतनीस एक पद बंजारा भाषिक अनिवार्य. हाणेगाव देवला तांडा मदतनीस एक पद बंजारा भाषिक अनिवार्य. हाणेगाव गणू तांडा मदतनीस एक पद बंजारा भाषिक अनिवार्य. १६) मौजे वझर क्र. चार मध्ये मदतनीस एक पद. १७) मौजे दावणगीर क्र. तीन मध्ये मदतनीस एक पद.१८) मौजे सांगवी करडखेड क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद.१९) मौजे झरी क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद. २०) मौजे सोमुर क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद. २१) मौजे येडूर ( बु.) क्र. एक मध्ये मदतनीस एक पद. २२) मौजे कोकलगाव क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद. २३) मौजे हनुमान हिप्परगा क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद. २४) मौजे चैनपूर क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद. २५) मौजे सांगवी उमर क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद. २६) मौजे बळेगाव क्र. तीन मध्ये मदतीस एक पद. २७) मौजे भायेगाव क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद. २८) मौजे भोकसखेडा क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद. २९) मौजे देगाव ( बु.) क्र. तीन मध्ये मदतनीस एक पद. ३०) मौजे कावळगड्डा क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद. ३१) मौजे तडखेल क्र. पाच मध्ये मदतनीस एक पद. तडखेल तांडा मदतनीस एक पद बंजारा भाषिक अनिवार्य.३२) मौजे खानापूर क्र. एक मध्ये मदतनीस एक पद. ३३) मौजे इब्राहिमपूर मदतनीस एक पद. ३४) मौजे सुगाव क्र. तीन मध्ये मदतनीस एक पद. मौजे सुगाव क्र. चार मध्ये मदतनीस एक पद. ३५) मौजे करेमलकापूर मदतनीस एक पद. ३६) मौजे नंदुर क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद. ३७) मौजे कोटेकल्लूर क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद. ३८) मौजे रामपूर पट्टी शहापूर मदतनीस एक पद. ३९) मौजे तुंबरपल्ली क्र. एक मध्ये मदतनीस एक पद. तर तुंबरपल्ली क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद. ४०) मौजे लोणी तांडा मदतनीस एक पद, बंजारा भाषिक अनिवार्य. ४१) मौजे किनी तांडा मदतनीस एक पद,बंजारा भाषेत अनिवार्य. ४२) मौजे हाळी क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद. ४३) मौजे टाकळी जहागीर क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद. ४४) मौजे मलकापूर मदतनीस एक पद. ४५) मौजे देवापूर क्र.एक मध्ये मदतनीस एक पद तर देवापूर क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद. ४६) मौजे चाकूर क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद. ४७) मौजे गवंडगाव पूर्व तांडा मदतनीस एक पद बंजारा भाषिक अनिवार्य. ४८) मौजे पिंपळगाव मदतनीस एक पद. ४९) कु.शा.वाडी (कुतुब शहापूर वाडी) क्र. दोन मध्ये मदतनीस एक पद या गावातील अंगणवाडी सेविका व मदतनीस या पदासाठी गाव ठिकाणी वेगवेगळे स्वतंत्र अर्ज विहित नमुन्यात अर्ज एकात्मिक बाल विकास प्रकल्प कार्यालयात सादर करावेत.

# अनु.जाती उपवर्गीकरण विधेयक महाराष्ट्र सरकारने मंजूर करावे

## महामोर्चात सहभागी होण्याचे अण्णा धगाटे यांचे कंधार येथे आवाहन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**कंधार । धोंडीबा मुंडे**

अनुसूचित जाती उपवर्गीकरण विधेयक महाराष्ट्र सरकारने मंजूर करावे.या मागणीसाठी दि.५ मार्च रोजी आझाद मैदान मुंबई येथे मांगवीर महामोर्चा आयोजित करण्यात आला आहे.तरी सकल मातंग व तत्सम वंचित जात समुहाच्या समाज बांधवांनी या महामोर्चात सहभागी होण्याचे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक, सामाजिक विचारवंत अण्णा धगाटे( पुणे) यांनी कंधार येथे आयोजित बैठकीत बोलताना केले.

सर्वोच्च न्यायालयाच्या निकाल व निर्देशानुसार राज्यातील अनु. जातीतील मागास अशा मातंग व तत्सम वंचित जात समुहाच्या मागणीनुसार अनुसूचित जाती आरक्षणाची पद्धत निश्चित करण्याठी राज्य सरकारने न्यायमूर्ती बदर यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमली. या समितीचा अहवाल घेऊन व महाराष्ट्र सरकारने नियुक्त



केलेल्या सर्व अभ्यास समितीचा शासनाकडे असलेल्या अहवाला आधारे अनु. जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण महाराष्ट्र राज्यात मंजूर करावे. हरियाणा, पंजाब, कर्नाटक व तेलंगणा, आंध्रपदेश आदी राज्यांनी अनु. जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण विधेयक पारित करत, आरक्षणाचे उपवर्गीकरण मंजुर केले आहे. सर्वोच्य न्यायालयाने दिलेल्या निकाल व निर्देशानुसार महाराष्ट्रातही अनु. जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण विधेयक मंजुर करावे.आणि सामाजिक न्यायाची प्रक्रिया सुरू करावी. अनु. जाती आरक्षणाचे उपवर्गीकरण मंजुरीचा तातडीने कायदा पारित करावा.या मागणीसाठी दलित महासंघ,लालसेना, अण्णाभाऊ साठे क्रांती आंदोलन आणि समविचारी संघटनेने मुंबई येथे मांगवीर महामोर्चाचे आयोजन ५ मार्च रोजी केले आहे.त्यात समाजातील बुद्धीवादी, सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे,समाज बांधवांनी संजय ताकतोडे यांचे बलिदान विचारात घेऊन सर्वांनी महामोर्चात सहभागी होण्याचे आवाहन ज्येष्ठ साहित्यिक, सामाजिक विचारवंत अण्णा धगाटे यांनी बैठकीत केले.

**यावेळी अण्णाभाऊ साठे क्रांती आंदोलनाचे संस्थापक अध्यक्ष सतीश कावडे, उपाध्यक्ष परमेश्वर बंडेवार यांनीही बैठकीत मार्गदर्शन केले.बैठकीच्या अध्यक्षस्थानी मनोहर वाघमारे होते. यावेळी जिल्हा प्रमुख नागेश तादलापूरकर,माजी पंचायत समिती सदस्य रामभाऊ देवकांबळे,पंडीत देवकांबळे, बाबुराव बसवंते, विनायक मोरे , सोपान कांबळे,विश्वाभंर बसवंते,विनय मोरे आदीसह मोठ्या संख्येने समाज बांधवाची उपस्थिती होती.**

# मातुळ येथे पाचव्या जनसंवाद राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलनाचे आयोजन

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नांदेड । बाजीराव पाटील गायकवाड**

सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समिती मातुळ व सप्तरंगी साहित्य मंडळ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने ५ वे जनसंवाद राज्यस्तरीय ग्रामीण साहित्य संमेलन भोकर तालुक्यातील मातुळ येथे दि २८ फेब्रुवारी रोजी आयोजित करण्यात आले आहे. संमेलनाध्यक्षपदी प्रा.डॉ.गजानन देवकर हे असणार आहेत.उद्घाटक म्हणून खासदार रवींद्र वसंतराव चव्हाण तर विशेष अतिथी म्हणून भोकर विधानसभेच्या आमदार श्रीजयाताई अशोकराव चव्हाण, माजी सभापती बाळासाहेब रावणगावकर, सभापती शिरीषभाऊ देशमुख गोरठेकर हे उपस्थित राहणार आहेत. स्वागताध्यक्ष म्हणून सतीश पाटील मातुळकर तर निमंत्रक म्हणून बालाजी सूर्यतळे हे असणार आहेत.




रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराज यांना समर्पित असलेल्या एकदिवसीय साहित्य संमेलनात शब्द जागर महोत्सव साजरा होणार आहे. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून माजी संमेलनाध्यक्ष प्रा.डॉ. जगदीश कदम, सविता प्रकाशराव कदम सरपंच मातुळ, ज्येष्ठ साहित्यिक मा.देविदास फुलारी, माधव बोईनवाड,आनंद सूर्यवंशी, बबलू पाटील मातुळकर, आनंद पाटील सूर्यवंशी, लक्ष्मण बोईनवाड, प्रवीण गायकवाड, मधुसूदन पवार,, प्रल्हाद हिंगोली, नागोराव कदम, सुमन गोणारकर,तुकाराम डांगे, पी एस मिस्तरी इत्यादी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

या साहित्य संमेलनामध्ये ग्रंथदिंडी,चित्र व नाणी प्रदर्शन, जनसंवाद विशेष पुरस्काराचे वितरण,परिसंवाद कथाकथन गझल संध्या व निमंत्रित कविंचे कवी संमेलन असा भरगच्च कार्यक्रम असणार आहे. गझल संध्या यात गझल मुशायरा अध्यक्ष म्हणून गझलकार आत्माराम जाधव असणार आहेत तर आत्तम गेंदे,यशवंत मस्के, रोहिणी पांडे,निशा डांगे, सतीश देशमुख, स्वाती भद्रे,विजय वाठोरे,दिपाली कुलकर्णी,अंजली मुनेश्वर, विजय धोबे,जयराम धोंगडे ,रघु देशपांडे हे सहभागी गझलकार म्हणून उपस्थित राहणार आहेत. या गझल मुशायराचे सूत्रसंचालन गझलकार चंद्रकांत कदम हे करणार आहेत. तर आभार प्रदर्शन रूपाली वागरे वैद्य हे करणार आहेत.या संमेलनासाठी संस्थापक अध्यक्ष अनुरत्न वाघमारे,राज्याध्यक्ष नागोराव डोंगरे यांच्यासह सप्तरंगी साहित्य मंडळाचे कार्यकारणी सदस्य तसेच सार्वजनिक शिवजन्मोत्सव सोहळा समितीचे सर्व पदाधिकारी परिश्रम घेत आहेत.

# रेखा बनसोडे शेळगावकर यांची अनेक महिला सह राष्ट्रवादी पक्षात वजनदार एन्ट्री

■ लोकनेता न्यूज नेटवर्क

**नायगाव । माधव बैलकवाड**

राष्ट्रीय काँग्रेस पक्ष नांदेड जिल्हा सरचिटणीस पदी असलेल्या रेखाताई बनसोडे शेळगावकर यांनी काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देऊन राष्ट्रवादी पक्ष अजित पवार गटात अनेक महिला सह नायगाव येथील नुकत्याच संपन्न झालेल्या पक्षप्रवेश सोहळा व सभासद नोंदणी या कार्यक्रमात आ. प्रतापराव पाटील चिखलीकर, शिवराज पाटील होटाळकर, जिल्हाध्यक्ष दिलीपराव धर्माधिकारी यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये प्रवेश केला आहे.

गेल्या अनेक वर्षापासून सामाजिक संघटनेत स्वतःला झोकून अविरतपणे गोरगरीब लोकांची निसीम सेवा रेखा बनसोडे शेळगावकर यांनी केली. गरजूंना हात दिल्या नंतर ती माणसं अशांना आपल्या हृदयात स्थान देतात या पद्धतीने रेखा बनसोडे यांचे काम तळागाळातील लोकांसाठी होते व आहे यापूर्वी त्यांनी वंचित बहुजन आघाडी मध्ये काम केले त्यानंतर राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या नांदेड जिल्हा सरचिटणीस पदांची धुरा यशस्वीरित्या सांभाळली त्यांचे राजकारणातील कामकमी पण



सामाजिक काम मोठे असल्याने त्यांच्या सामाजिक कामामुळे त्यांना असंख्यजनाचा मोठा परिचय आहे. नांदेड जिल्ह्यात रेखा बनसोडे शेळगावकर यांच्या संघटनामुळे चांगलीच मजबुतीकरण होईल असे सध्या तरी दिसून येते नांदेड जिल्ह्यातील राष्ट्रवादी पक्षाचे वजनदार नेते आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये रेखा बनसोडे यासह चौत्राबाई भालेराव, कमलबाई दासवाड,शिल्पा गायकवाड, मंगलबाई भालेराव, सावित्राबाई दासवाड,शोभाताई दिवडे, अश्विनी भालेराव, गंगाबाई भालेराव, पद्मिनी भालेराव,अनिता देवकर, कमलबाई गवाले, राधाबाई भालेराव, गंगाबाई सूर्यवंशी, पूजा भालके या महिला सह अनेक महिलांनी प्रवेश केल्यामुळे आमदार चिखलीकर यांनी त्यांचा सन्मान करून शुभेच्छा दिले.रेखा बनसोडे शेळगावकर यांना वरिष्ठ पदावर राष्ट्रवादी पक्षांच्या नेत्यांनी नियुक्ती करावी असे त्यांच्या हितचिंतक महिलातून बोलले जाते.

हे पत्रक,मालक,मुद्रक, प्रकाशक संपादक ज्ञानेश्वर भाऊसाहेब मुंढे यांनी न्यू गीता प्रिंटिंग प्रेस मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ येथे छापून दैनिक लोकनेता कार्यालय हो.नं ५०,मेन रोड मिरकाळा ता गेवराई जि बीड ४३११२७ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले आहे. मो.नं ८४५९९७७९०४

This Newspaper is printed by owner, printer, publisher editor Dyaneshwar Bhausaheb Mundhe at New Geeta Printing Press Mirkala Ta Gevrai District Beed 431127 and published at Dainik Lokneta Office Ho.No. 50, Main Road Mirakala Ta Gevarai District Beed 431127 (Maharashtra) Mo no 84599 77904